तात्काळ

क्रमांक : - १४२२ /ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १५ जानेवारी, २०१६.

प्रेषक :

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

प्रति :

विधानसभेचे सर्व सन्मा. सदस्य.

विषय: <u>मा. सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्विकारण्याबाबत.</u>

महोदय/महोदया,

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेच्या **बुधवार, दिनांक ९ मार्च, २०१६** रोजीपासून **विधान भवन, मुंबई** येथे सुरु होणाऱ्या आगामी अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरिता गटामध्ये समाविष्ट असलेले मा. मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी नमूद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग-दोनव्दारे सर्व मा. सदस्यांना **शुक्रवार, दिनांक १५ जानेवारी, २०१६** रोजी वितरित करण्यात येत आहे (प्रत सोबत जोडली आहे)

मा.अध्यक्ष यांच्या निदेशानुसार आगामी अधिवेशनाकरिता Online पध्दतीने प्रश्न सूचना स्विकारण्यात येणार आहेत. तथापि, सर्व सदस्यांकडून Online पध्दतीने प्रश्न सूचना सादर करण्याकरिता QIS या संगणक प्रणालीचा नव्याने होणारा वापर व सद्य:स्थितीत काही सदस्यांकडे त्याकरिता आवश्यक तांत्रिक बाबींची अनुपलब्धता असण्याची शक्यता विचारात घेता, आगामी अधिवेशनाकरिता Offline पध्दतीनेदेखील प्रश्न सूचना स्विकारण्यात येतील.

या सचिवालयातील **"ब"** कक्षात मा.सदस्यांना वा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधींना तारांकित प्रश्नांचे प्रपत्र उपलब्ध करुन देण्यात येतील. प्रत्येक अधिवेशनासाठी या सचिवालयाकडून स्वतंत्रपणे छापण्यात येणाऱ्या तारांकित प्रश्नांच्या प्रपत्रातच प्रश्न सूचना देण्यात याव्यात. तसेच प्रश्न सूचनेवर एकापेक्षा जास्त सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असतील, तर स्वाक्षरीच्या खाली सदस्यांनी आपले नाव व नावांचा क्रम स्पष्टपणे नमूद करावा जेणेकरुन त्यांची स्वाक्षरी ओळखणे सुलभ होईल व सूचनेसाठी सदस्यांच्या नावांचा क्रम निश्चित करणे सोईस्कर होईल.

**शुक्रवार, दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी पासून कार्यालयीन वेळेत QIS या संगणक प्रणालीवर Online पध्दतीने व "ब" कक्षात (कक्ष क्रमांक १२०४) बारावा मजला, विभान भवन, मुंबई येथे Offline पध्दतीने तारांकित प्रश्न सूचना स्विकारण्यात येतील.**

कृपया याची नोंद घ्यावी, अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

(ना.रा.थिटे)
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

याची प्रत माहितीसाठी :-

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये,
विधान भवन, मुंबई- ४०० ०३२.

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**शुक्रवार, दिनांक १५ जानेवारी, २०१६ / पौष २५, शके, १९३७**
**महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०१६ मधील पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील (माहे मार्च-एप्रिल, २०१६)**
**तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम**

२. महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०१६ मधील पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन **(माहे मार्च-एप्रिल, २०१६)** कालावधीकरिता माननीय मंत्री महोदयांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी माननीय अध्यक्षांनी पुढीलप्रमाणे दिवस नेमून दिले आहेत. ज्या दिनांकास प्रश्नाचे उत्तर हवे असेल तो दिनांक विवरणाच्या स्तंभ (३) मध्ये दर्शविलेला असून त्या दिवशी विचारावयाच्या प्रश्नांच्या सूचना या सचिवालयास मिळण्याच्या अखेरचा दिनांक विवरणाच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविलेला आहे. (प्रश्नांच्या सूचना मिळण्याच्या अखेरच्या दिनांकास सुट्टी असेल त्यावेळी त्या पूर्वीचा दिनांक दर्शविण्यात आला आहे.)

आगामी अधिवेशनासंबंधातील दिनदर्शिकेतील आखलेल्या कार्यक्रमात बदल झाल्यास त्यानुसार प्रस्तुत चक्रानुक्रमात बदल होईल.

मा.सदस्यांना प्रश्नांच्या सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून माननीय मंत्री आणि त्यांच्या अधीन असलेले विभाग यांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे **(पृष्ठ क्रमांक ३ व ४)**

पहिल्या आठवडयातील तारांकित स्विकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट **सोमवार, दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६** रोजी दुपारी ४.०० वाजता व त्यापुढील आठवडयातील तारांकित स्विकृत प्रश्नांचे बॅलट त्यानंतरच्या प्रत्येक सोमवारी दुपारी ४.०० वाजता **विधान भवन, मुंबई** येथे उप सचिव/अवर सचिव/अवर सचिव (समिती) यांच्या दालनात घेण्यात येईल. याबाबतची माहिती पत्रक भाग दोनद्वारे मा.सदस्यांना कळविण्यात येईल. सदरहू बॅलटसाठी मा.सदस्यांना उपस्थित राहता येईल, **परंतु त्यांना प्रवास किंवा दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.**

## विवरणपत्र

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(२) आदिवासी विकास मंत्री<br>(३) उद्योग मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री<br>(५) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री | सोमवार, दिनांक १४ मार्च, २०१६.<br>सोमवार, दिनांक २१ मार्च, २०१६.<br>सोमवार, दिनांक २८ मार्च, २०१६.<br>सोमवार, दिनांक ०४ एप्रिल, २०१६<br>सोमवार, दिनांक ११ एप्रिल, २०१६<br>*सोमवार, दिनांक १८ एप्रिल, २०१६ | शुक्रवार,दिनांक १२ फेब्रुवारी,२०१६<br>गुरुवार,दिनांक १८,फेब्रुवारी,२०१६<br>शुक्रवार, दिनांक २६ फेब्रुवारी,२०१६<br>शुक्रवार, दिनांक ०४ मार्च, २०१६<br>शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०१६<br>शुक्रवार, दिनांक १८ मार्च, २०१६ |
| दोन | (१) मुख्यमंत्री<br>(२) गृहनिर्माण, खनिकर्म व कामगार मंत्री | मंगळवार, दिनांक १५ मार्च, २०१६<br>मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०१६<br>मंगळवार, दिनांक २९ मार्च, २०१६<br>मंगळवार, दिनांक ०५ एप्रिल, २०१६<br>मंगळवार, दिनांक १२ एप्रिल, २०१६ | शुक्रवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६<br>शनिवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१६<br>शुक्रवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१६<br>शनिवार, दिनांक ०५ मार्च, २०१६<br>शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०१६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| तीन | (१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री<br>(२) ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री<br>(३) जलसंपदा मंत्री<br>(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री | | बुधवार, दिनांक १६ मार्च, २०१६.<br>बुधवार, दिनांक २३ मार्च, २०१६.<br>बुधवार, दिनांक ३० मार्च, २०१६.<br>बुधवार, दिनांक ०६ एप्रिल,२०१६<br>बुधवार, दिनांक १३ एप्रिल,२०१६<br>*बुधवार, दिनांक २० एप्रिल,२०१६ | शुक्रवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६<br>शनिवार, दिनांक २० फेब्रुवारी, २०१६<br>शुक्रवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१६<br>शनिवार, दिनांक ०५ मार्च, २०१६<br>शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०१६<br>शनिवार, दिनांक १९ मार्च, २०१६ |
| चार | (१) महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>(२) परिवहन मंत्री<br>(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री | | गुरुवार, दिनांक १० मार्च, २०१६<br>गुरुवार, दिनांक १७ मार्च, २०१६<br>गुरुवार, दिनांक ३१ मार्च, २०१६.<br>गुरुवार, दिनांक ०७ एप्रिल, २०१६.<br>*गुरुवार, दिनांक २१ एप्रिल, २०१६. | सोमवार, दिनांक ०८ फेब्रुवारी, २०१६<br>सोमवार, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१६<br>सोमवार, दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६<br>शनिवार, दिनांक ०५ मार्च, २०१६<br>सोमवार, दिनांक २१ मार्च, २०१६ |
| पाच | (१) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री<br>(३) पर्यावरण मंत्री<br>(४) पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री | | शुक्रवार, दिनांक ११ मार्च, २०१६.<br>शुक्रवार, दिनांक १८ मार्च, २०१६.<br>शुक्रवार, दिनांक ०१ एप्रिल, २०१६.<br>*शुक्रवार, दिनांक २२ एप्रिल, २०१६. | मंगळवार, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१६<br>मंगळवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६<br>मंगळवार, दिनांक ०१ मार्च, २०१६<br>मंगळवार, दिनांक २२ मार्च, २०१६ |

*आगामी अधिवेशनाच्या बुधवार, दिनांक ९ मार्च, २०१६ ते बुधवार, दिनांक १३ एप्रिल, २०१६ या कालावधीत वाढ झाल्यास पूर्वखबरदारी म्हणून जादा एक आठवड्याच्या प्रश्नसूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : १५ जानेवारी, २०१६

डॉ.अनंत कळसे
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

प्रति :

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व मा. सदस्य.
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष यांना अग्रेषित.

## मंत्र्यांची नावे व त्यांच्या अधीन असलेले विभाग

(१) **श्री.देवेंद्र फडणवीस— मुख्यमंत्री**

(१) सामान्य प्रशासन विभाग
(२) नगरविकास विभाग
(३) गृह विभाग
(४) विधि व न्याय विभाग
(५) बंदरे विभाग
(६) पर्यटन विभाग
(७) माहिती व जनसंपर्क विभाग
(८) माजी सैनिकांचे कल्याण विभाग
(९) राजशिष्टाचार विभाग
(१०) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग व इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग व त्यांचे भाग

(२) **श्री.एकनाथराव गणपतराव खडसे— महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय,राज्य उत्पादन शुल्क मंत्री**

(१) महसूल व वन विभाग (महसूल विषयक आणि पुनर्वसन व मदत कार्य आणि भूकंप पुनर्वसन विषयक बाबी)
(२) अल्पसंख्यांक विकास विभाग (अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ विषयक बाबी)
(३) कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग
(४) गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क विषयक बाबी)

(३) **श्री.सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार — वित्त आणि नियोजन, वने मंत्री**

(१) वित्त विभाग
(२) नियोजन विभाग
(३) महसूल व वन विभाग (वने विषयक बाबी)

(४) **श्री.विनोद श्रीधर तावडे — शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री**

(१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
(२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग
(३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (वैद्यकीय शिक्षण विषयक बाबी)
(४) मराठी भाषा विभाग
(५) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (सांस्कृतिक कार्य विषयक बाबी)

(५) **श्री.प्रकाश मंचूभाई महेता — गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्री**

(१) गृहनिर्माण विभाग
(२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (कामगार आणि खनिकर्म विषयक बाबी)

(६) **श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील — सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**

(१) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभाग
(२) सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून)

(७) **श्रीमती पंकजा गोपीनाथ मुंडे — ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बालकल्याण मंत्री**

(१) ग्रामविकास आणि जलसंधारण विभाग
(२) नियोजन विभाग (रोजगार हमी योजना विषयक बाबी)
(३) महिला आणि बालकल्याण विभाग

(८) **श्री.विष्णु रामा सावरा ---- आदिवासी विकास मंत्री**
आदिवासी विकास विभाग

(९) **श्री.गिरीष भालचंद्र बापट ---- अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**
(१) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग
(२) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग (अन्न आणि औषध प्रशासन विषयक बाबी)
(३) संसदीय कार्य विभाग

(१०) **श्री.गिरीष दत्तात्रय महाजन ---- जलसंपदा मंत्री**
जलसंपदा विभाग

(११) **श्री.दिवाकर नारायण रावते ---- परिवहन मंत्री**
गृह विभाग (परिवहन विषयक बाबी )

(१२) **श्री.सुभाष राजाराम देसाई ---- उद्योग मंत्री**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग विषयक बाबी)

(१३) **श्री.रामदास गंगाराम कदम ---- पर्यावरण मंत्री**
पर्यावरण विभाग

(१४) **श्री.एकनाथ संभाजी शिंदे ---- सार्वजनिक बांधकाम मंत्री**
सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम)

(१५) **श्री.चंद्रशेखर कृष्णराव बावनकुळे ---- ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा विषयक बाबी)

(१६) **श्री.बबनराव दत्तात्रय लोणीकर ---- पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री**
पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग

(१७) **डॉ.दीपक रामचंद्र सावंत ---- सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री**
सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण विभाग

(१८) **श्री.राजकुमार सुदाम बडोले ---- सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**
सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग